ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८


email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | मीलन |
| लेखक | : | य. द. भावे |
| प्रकाशक | : | चित्रशाळा प्रकाशन, पुणे |
| प्रकाशन वर्ष | : | १९५६ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३




D.V.POTDAR
S P COLLEGE
D02749
2749
861.6
Bha
5253
२८६
861.6

# मी लन

[ एका प्रेमी तरुणाच्या आत्म्याची कथा ]

य. द. भावे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

# मी लन

[ एका प्रेमी तरुणाच्या आत्म्याची कथा ]

य. द. भावे

किंमत एक रुपया

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २

☆

प्रथमावृत्ति
फेब्रुवारी १९५६

☆

य. द. भावे
यांचे काव्य-संग्रह
आ र्द्रा
हळवें भिंग
आगामी
पु न र्व सु

☆

सर्व हक्क स्वाधीन

# मीलनापूर्वी —

**मीलन** ही एका प्रेमी तरुणाच्या आत्म्याची कथा. त्याची प्रेयसी, तिच्या मरणामुळें त्याच्यापासून नुकतीच दूरावली आहे. तें दुःख अगदीं ताजें आहे. तिची पहिली भेट झाली, जेव्हां, 'जास्वंदीच्या कळ्या लाल खिदळल्या,' तेव्हांपासून तिच्या सहवासांत अनुभवलेल्या सुखांची स्मृति, तिच्या मरणाचा दुःखदायक आठव, त्याचें अंतरंग जाळीत येतात. त्याला सांत्वनाचा मार्ग सांपडत नाहीं. दुसऱ्या स्त्रियांच्या सहवासांत, किंवा, दारूच्या पेल्यांत, तें दुःख नाहींसें होणें शक्य नाहीं. कारण त्यानें आपल्या प्रेयसीवर इतकें निःसीम प्रेम केलें आहे कीं, तें पाहून खुद्द जीवनाच्या पापण्यांनासुद्धां 'मूकतेचे आंसू आले'! त्याला तिचा विरह अत्युत्कटत्वानें जाणवतो. पण, 'विरहाच्या वैभवांत पुनः प्रेमाचे विश्व जिंक'— अशा अर्थाच्या कुण्या कवीच्या काव्यपंक्ती, त्याला आठवतात. विरहाचें वैभव म्हणजे, दुःखाचें वैभव, हें त्याला कळतें. दुःखाच्या रूपांतील विविधतेच्या मागील अद्वैत त्याला जाणवतें. त्या अद्वैतांत दुःखितांचें अंतरंग पहावें, अशी प्रबल इच्छा त्याच्या मनांत उपजते. मनामध्यें समष्टीचें चैतन्य फुलतें. 'दत्त दत्त दयध्वम्' हा संदेश तरलत येतो. रेताडल्या प्रदेशांत तो पाणपोया घालतो; आणि तृषार्ताच्या तृतावलेल्या पडसादांत तो आपल्या प्रियेला न्याहाळतो आणि त्याचें मन तृतावतें. आपली प्रिया शरीरानें जरी हजर नसली तरी ती सर्व विश्वांत भरून राहिलेली आहे व पुढेंहि **मीलन** आहे याचा त्याला साक्षात्कार होतो. 'वर्षा'आधीची भगभग शांत होते. त्याच्या मनांतलें द्वंद्व शमतें. चंद्रताऱ्यांच्या चुऱ्यांचें मंथन होऊन जीवनाच्या स्वर्णतेंतून ध्रुवतेचें **मीलन** होतें.

उण्यापुऱ्या अडीच वर्षांपूर्वी, पाऊस सुरू होण्याच्या आधींच्या तगमगींत, १९४४ सालीं राजकोट येथें ऐकलेल्या व उर्दू अवगत नसल्यानें अर्धवट

समजलेल्या एका २५००–३००० ओळींच्या प्रदीर्घ उर्दू काव्याची * स्मृति अचानक जागी झाली. त्यालाच मुनांतील जागून उठलेल्या वाङ्मयीन व जीवनाच्या अनुभवाची जोड मिळाली; आणि स्मृतीच्या ठिणगीची ज्वाला होऊन '**मीलन**' जन्माला आलें. अगदीं फराटलेल्या गिचमिडलेल्या ओळींच्या रूपांत, कागदांच्या कपट्यांवर तें कितीतरी दिवस पडून राहिलें ! आमच्या कॉलेजांतील श्री. वेलणकर यांनीं आपल्या सुंदर हस्ताक्षरांत एक प्रत तयारी केली. पण ती हरवून गेली. पुनः कच्च्या खर्ड्यांवरून सर्व कविता लिहून काढली; आणि श्री. दा. पां. रानडे (चित्रशाळा प्रेस) यांच्या आपुलकीनें, ती आज छापली जाण्याचा सुयोग येत आहे. याबद्दल त्यांचे किती व कसे आभार मानावे हें कळत नाहीं.

'मीलन'चें मुखपृष्ठ श्री. दलाल यांच्यासारख्या कसलेल्या कलावंताच्या कुंचल्यांतून उतरलें आहे. त्याची कल्पना प्रा. पु. ल. देशपांडे यांची आहे. दोघांना मनःपूर्वक धन्यवाद.

'मीलन'चीं मुद्रितें प्रा. कुलकर्णी व चिटणीस यांनीं काळजीपूर्वक तपासलीं. आत्मीयतेनें कवितेबद्दल 'कांहीं कांहीं सुचविलें' त्याबद्दल त्यांचा मी फारच ऋणी आहें.

**मीलन** ही कविता माझ्या अनेक मित्रांनीं, वा कविमित्रांनीं वाचली. प्रेमानें अनेक सूचना केल्या; व "ती आवडली" असें सांगून दिलासा दिला म्हणूनच ती छापण्याचें मी साहस करीत आहें. त्या सर्वांची मीं कृतज्ञभावानें आठवण ठेवली आहे.

दसरा, २६-१०-५५. **य. द. भावे**

---

* त्या उर्दू कवितेचें नांव आठवत नाहीं; आणि ज्या मित्रानें ती वाचून दाखविली तोहि आज हयात नाहीं. त्यामुळें त्या कवितेचें नांव सांगणें अशक्य होऊन बसलें आहे.

वा. ल. कुलकर्णी

यांना

स प्रे म भे ट

# मी ल न

## १....

आतां विरली —
स्वप्नामधल्या मोतीयाच्या फुलासारखी
लकलकणारी लहर चांदणी;
रातराणिची मत्त सुगंधित गाढ चुंबनें;
चित्रित रंगित किसलय कोमल
कुसुमित संध्या थरथरणारी;
रुईफुलांच्या ढगाढगांतिल
मउ पदराची
निळी अंजिरी मोरपिसाच्या छटाछटांचीं
तरल कंपनें.
आतां उरली —
' वर्षा ' आधिची भगभग तगमग
जयांत जाळित पडलें ऊन
अपुलें अंग अंतरंगही.
बाष्पावृत ते डोंगर जांभ झुरती खिन्न.
झाडें गिळती फिक्या सांवल्या.
वेल जाइची मरगळलेली गुलाबकांटे स्फुंदत चघळी.
खिन्न अशा या स्तब्धतेंत —
वर्तमानचें पडलें प्रेत.
भविष्य आहे अगम्य भूत.
गतकालाची उरली फक्त स्मृती जिवंत......

☆ ☆

२....

ऐन दुपारीं,
बाष्पानें जड तडफडणाऱ्या
उन्हांत आलिस
अंगणांत मम
कोमजलेली तहानलेली.
भिजुनी गेली घामजलानें
सरकवलीस वेणी मागें देउन झटका;
झिळमिळली मग, ओली स्नेहल रेशीम कांती
वदनावरची सुषमालाली.
अन् लांब नितळशीं, निमुळ निमुळतीं
बोटें जुळवुन
जलप्राशाया पसरलीस तूं सान अंजुली.
मेंदि नखांची चमकचमकली
— क्षितिजावरच्या जास्वंदीच्या कळ्या गुलाबी
लाल खिदळल्या......
या तल्खालिंताहि पुनः चमकतें
सारें सारें...
तप्त आसवें भिजुनी गेलें.

☆ ☆

३....

माझ्या पायापाशीं
पडलें पर्ण
शुष्क पिवळें जीर्ण
त्याच्या रेषा
येथ मी वाचीत उभा
वाचल्यास जशा
कलत्या सूर्याखालीं
माझ्या हातावरच्या रेषा !

☆ ☆

४....

आणि मग रोज रोज
थांबलीस माझ्या दारीं
फुलवीत मनांतली
शुभ्र मोगऱ्याची कळी.
हळूहळू सुटे सैल
कळीचा मउ पदर
भरला घमघमाट
अंतरांत माझ्या दाट !

☆ ☆

५....

एके दिनीं सळासळा
सळसळल्यात धारा
अंगणाच्या कोपऱ्याला
रंग हिरवा भरला

सोनचांफ्याचीं कुसुमें
उन्मादक थरारलीं
गुलाबाच्या फुलांतही
धुंदी रंगाची भरली.

सळासळा सरासरा
सोनसळी आल्या धारा
मुग्ध हिरवळीवर
मोत्याचा हलला पारा !

☆ ☆

६....

धूसरशा श्यामलशा
पसरल्या व्योमाखालीं
रेशमी उन्हाची झाली
जलधारांशीं गुंफणी
अलगूज वाजवीत
ओलसर वारा आला
जीवैक्याच्या कमलाला
भृंग प्रेमाचा भेटला.

☆ ☆

७....

आणिक मग ती
मादकगंधी
रात्र चांदणी...
श्वेतढगांच्या फिकट फिकटशा
सुरयाकृतिंना चषकाकृतिंना
चुंबित होत्या चटक चांदण्या.
चंचल रात्रीच्या गात्रावर
लाजत फुलल्या
उन्मद कालिका.

दुरून आले,
सूक्ष्मसुखदसे श्रुतीमधुरसे
स्वरलहरींच्या तद्रपतेचे
झोंकदारसे गझ्झल चरण.
उमलुन आले, तव अंगांतुन
अर्धावृतसे, अधीरलेले
कळे चांदणी गुलाबमिश्रित.
जिथें रंगली अधीर उत्सुक रंगित मैफल
पानविड्याची
लाल चुटुकशा त्या ओंठावर चांद वितळला.
ओल्या ओल्या
त्या ओंठांचे
ठसे उमटले मम ओंठावर.
अंगांगांतुन
क्षणांत फिरली
मद्यार्कांची
हवरी सोत्सुक
चुंबक शक्ती, क्षुब्ध वेदना.
अकल्पीतशा त्याच क्षणांतुन
धुंद अमरता गेली चमकुन
दोघांमधल्या
एकांताचे रेशिम भिजवुन !

☆ ☆

८....

अघटित घडलें कालप्रवाहीं

पानविड्याची सुकली लाली

मृत्तीकेच्या शय्येवरती

मृत्तीकेची घेउन ओढण

निपाचित पडली

शृंगाराची रम्य लावणी.

चंद्रकोरिचा ओघळ सुकला

पेला उपडा सुरई फुटली...

आणि आजच्या नीरवतेच्या

तल्खलींतुनी

सुकल्या पिकल्या गुल् पानावर

तरंगते ती

पानविड्याची विरही लाली

स्वप्नामधली साक्षात्कारी मागें चाहुल

नुसती उरली !

☆ ☆

१....

टेकडीच्या पायथ्याशीं
लांबदूर विस्तीर्णसा
वाटे शांत पसरला
जलाशय भरलेला.

त्याच्या आणाव्या कावडी
ओताव्यात रांजणांत
त्याला लागावा मंद
वाळा–कापूराचा वास

पण...पुनः एकदां तूं
येशिल कां माझ्या दारीं
बावरली तहानली
पसरुनी ती अंजुली.

कुठचें तें, कसचें तें,...
मनांतले रहायाचे
मनामधीं सारे हेत
जरी प्रतीक्षा अनंत !

☆ ☆

१०....

रिकामे रांजण

रिकाम्या सुरया

विकलांग पडल्या

टाकून माना.

पडलें वारें

दबकत फिरतें

या पोकळींत

त्या पोकळींत—

" सुरई रांजण पाण्यासाठीं... "

☆ ☆

## ११....

रणरणत्या मार्गावर क्षुण्ण श्वास भिरभिरती
मूक वृक्ष छायांना अंतरांत गिळताती.
ओठींची प्यास पीत पीतगवत व्याकुळतें
मृगजलाच्या तनुवरती खेद वाफ दरदरते.
मनचंबू गरगरतो उंच उडे झांकणहि
छायेची मजपुढती ताठ उभी रेखाकृति.
गुल्कळी ओष्ठपुट सुकलेले दुमडीती
अन् म्हणे, ‘ लगी प्यास, दे पाणी, दे पाणी ! ’
वेटोळी वाफेची फिसफिसती खिदखिदती
अवकाशीं विरते ती छायेची रेखाकृति.
ओठींची प्यास पीत, मन माझें व्याकुळतें
एकाकी...तनुवरती स्वेद–वाफ दरदरते !

☆ ☆

## १२....

गुदमरलेल्या, वातावरणांत, ये,
बनुनी झुळूक.
कोंदल्या गगनीं ये
होउनी वीज.
बाष्पत्वचा छेदुन ये
बनुनी धार.
बनाशिल, तूं जरी,
वीज, झुळुक अन् वर्षाधारा,—
अतृप्तीच्या मनोव्यथेला
तृप्ती लाभायाची नाहीं.
ज्या देहाला आणि मनाला
एकदांच जरि ओळख झाली—
मुसमुसणाऱ्या अशोकपर्णी तव ओठांची;
गोकर्णीच्या निळ्या फुलांच्या तव नेत्रांची;
निशिगंधाच्या अन् गंधनशेच्या तव देहाची;—
त्यांची तृप्ती तशाच तनुच्या सौंदर्यीच फक्त व्हायची.
उपभोगाया चुकुनि लाभली
तुझ्याच सम पण तनू दुजीची;...
फसेल तन पण कळेल मनच्या अंतर्विश्वीं,
"तनू दुजीची...!"......
असंख्य इंगळ्या डसल्या गत अन् फिरेल मागें तनुही माझी
अशीच वृत्ती, साक्षात्कारी मनामनाच्या मीलनांतली.

☆ ☆

# १३....

ऊन उकलतें मेघरुजामा
अंतर्मन अन् जखम चांदणी
स्रवते भुरभुर गर्भ रेशमी
कंपित कूजन गगनामधुनी.
...आणि कालचा, घसरत येतो
नयनकडांवर
चांद चोखुनी गहिंवरलेल्या
स्वप्नमयाचा,
दंहिवरलेला आंसू मोती.
येशिल कां तूं पुनश्च परतुन
पसरत विखुरत गंध मातिचा
गतवर्षींच्या कृत्तीकेच्या
निःश्वासांतिल लहरींच्या सम ?
श्वास रोखुनी
अचल उभा मी
स्थाणुत्वाचा जणूंच पुतळा;
अधिरी इच्छा अधू मनाला —
मेंदिरसाची गुटी प्यायला
तुझ्याच गालीं ओसंडावा
चांद चोखुनी गंहिवरलेला
स्वप्नमयाचा
आंसू-मोती !

☆ ☆

१४....

दारावरुनी जातो कोणी एक कुंभकार.
निथळती त्याच्या मुखावरुनी घर्मज बिंदू.
त्याच्या येते हांक मुखांतुन:
" सुरई, रांजण, पाण्यासाठीं
सुरई पेले मद्यासाठीं
चषक गोजिरे गुंगीसाठीं
धुंदीसाठीं;
घ्या हो घ्या अन् लुटा मजेला...
क्षणभंगुर तर आहे जीवन.
" सुरई पेले सुरई रांजण
क्षणभंगुर तर आहे जीवन...
कुणा अनोखी कुंभाराच्या चाकावरती फिरली माती
तुडविलेली ओली माती
घेते रूपें —
सुरई पेले, सुरई रांजण.
भट्टींत भाजुन कणखर बनतां
चित्रकारही करतो शोभित तनू तयांची.
वेलबुटीतर नाजुक कोमल एका बाजुस,
चंद्रीकेच्या कोरीखालीं, दुसऱ्या बाजुस

लचकत लवती अर्धावृतशा अप्सरसांचीं सुरम्य अंगें.
किंवा बैसे पुरु एकला जपत उर्वशी करीत हाय.
किंवा शीला इंद्रापाशीं पतिभेटीस्तव धरते हट्ट.
यमधर्माच्या मागें धांवे सत्यवान—प्रिया लाडकी.
किंवा राधा वेणुसुरांच्या मागें धांवे बनुनी वेडी.
पुष्पपुरीचा कुणी पातशा आदा करितो अपुलें राज्य.
किंवा भोळी कुणी स्नेहला प्रेमापायीं खाते वीषच......
सुरम्यता पण कितिहि वाढली
राांजणांचि अन् सुरयांची
पेल्यांची अन् चषकांचीही,
निर्घृण नियती
खेळ खेळतां
होते माती !

☆ ☆

१५....

सुंदर सुरया नकशीवाल्या.
रंग सुरंगी घाटदार अन् डौलदारही
    मध्यें क्षामा
    रुंद नितंबी.
मद्यार्कांची रया तयांवर
अरूफुलांची हाव तयांवर
अमृततेची माया त्यावर.
पण ती माया
    नुसतें मृगजल.
खर्वडाल जर देह तयांचा
    जरा नखांनीं,
दिसेल तुम्हां
    माती माती
जशी पसरली माळावरती !

☆ ☆

## १६....

असेंच जीवन अस्थिर भंगुर
आंब्यावरचा मोहर सारा जळुनि जायचा,
स्वप्नपांखरें उडुनि जायचीं,
घरट्यामधली काडी काडी गळुनि जायची,

निर्जिव माती
उरावयाची;
...आणि मनाच्या
पोकळींतुनी
सूर यायचे —

" मरणाच्या ताऱ्याकडे
झेंपावतो माझा जीव.
मृत्युविना नसे अंत
माझ्या वेदनांना अन्य ! "

☆ ☆

## १७....

कधीं यायची रात काजळी
घुमघुमणारी मत्त हस्तिनी ?
कधीं यायचें काळें वादळ,
कडकडणाऱ्या विजांस हांसत ?

कधीं भेटेल रवी शशीला
नभाखालतीं गाढ तमाच्या ?
उतरायाचा कधीं भार हा
आवेगांचा मनोमनांतिल ?

☆ ☆

## १८....

ये मरणा तूं,
घेउन गूढ सुंदरता तव.
हे असीमा, सीमेमध्यें
ध्वनित होउं दे
तुझेच सूर.
रंगाच्या, गंधाच्या गानाच्या छंदाच्या
लीलांचा तव
वाहूं देच पूर.

काळ्या काळ्याशार, तुझ्या नयनांनीं,
अनिमेष डोकाव, माझ्या नयनांत.
घननील श्यामल थंडगार स्पर्श तुझा
माझ्या ओंठीं
तरळूं दे रे.
हृदय-स्पंदन,
'तिच्या अंजुलीच्या' स्थिर आठवांत
होउं दे बंद,
एकाच तुझ्या कला-रवांत.
जाऊं दे रे, क्षितिजापार
तनुपिंजऱ्यांतिल शिणला पक्षी.
घनदाट तुझ्या केसांच्या शेवीं, चमचमते
जी परिस झळाळी,
एक पळभर तरि फिरवना
माझ्या तनूवरी...
...आणि टाक रे पुसुन
वि...भा...ग...रे ...षा
अंत-अनंताची !

☆ ☆

१९....

पण ओढ मरणाची
    जरि मनाच्या अंतरीं
तरि जिता अजुनी मी
    क्षितिजाला न्याहाळीत.

माझ्या अंतराची ओढ
अंतरालाहि कांपते
पण अनामिक कांहीं
ओढीला मागें ओढतें.

मरणाची नियतीची
    अशीच कां गोष्ट न्यारी,
जिथें वांछा मरायाची
तिथें सक्ति जगायाची ?

☆ ☆

## २०....

जगावयाची आहे सक्ती ?
कसची ? कुठची ? ...
उगाच कुरकुर !
मरणें आहे अगदीं सोपें
जीवन आहे नुसतीच वाफ.
मरावयाचें मनांत येतां—
सुसज्ज मृत्यू दारापाशीं
लखलखताती पाणी प्यालीं तजले खडगें.
सुऱ्या कटारी बागनटांचीं तीक्ष्णच टोकें.
हाटामध्यें कुप्या गुलाबी विषाविषांनीं तुडुंब भरल्या
बचनागाची स्फटिक चूर्णिका हिरकणीचा मृत्यू-ठेवा.
जीवन अन् तर फुलासारखें
पानावरच्या दंवासारखें
मृत्यूरज्जूवरी तरलतें
तृणांकुरांच्या कोमलतेचें.
जरा खोच ती तल्वारीची
इवला घुटका विषपेल्याचा
चिमूट छोटी वचनागाची
चव थोडीशी हिरकणीची—
क्षणांत कांहीं
उडेल पक्षी
तनु पिंजऱ्यांतुन
अवकाशांत.

ठेउन मागें
        अरूप काळी अचेतनाची
माती कळपट.
मरणें आहे अगदीं सोपें...
जादूगारी जगांत या पण
जीवनरज्जुस तुटक्या दुबळ्या
सदाच बसतो चिकटुन मानव.
बिन सुटणारें जीवनकोडें !
ओंठावरती जरि तरंगते, मृत्यूसाठीं आर्त प्रार्थना
मनोमनाच्या कोपऱ्यांत पण जगावयाची प्रबल वासना.
असेंच कारण...
            किंवा दुसरें ?
झुंजूमुंजू संसाराच्या
पैलतिरावर मुलुख मृत्युचा;
अगम्य त्याचीं भीषण गूढें.
त्या गूढांची भीति गुप्तशी
जगावयाची करते सक्ति ?
            असेंच कांहीं ? कारण... दुसरें ?
            बिन सुटणारें जीवनकोडें.
मरणाचा मी, जरी सोबती, जीवन आहे प्यार त्याहुनी
'आत्महनन हें धंद्यासाठीं,—
        शिकलों शिकलों
            तव सांगातीं !

☆ ☆

## २१....

जगावयाचें... ...
जगावयाचें ?
करतो राज्य राजा वा राव,
विविध भोगतो आम्ही आपदा
आणिक स्वतंत्र आपुले आम्हीच
टाकावया भार आपुल्यावरीच.
संत नि हुतात्मे संत हुतात्म्यांची
पहात प्रतीक्षा गेले शिणून.
आपुल्या बळें बोलवत नाहीं
गुरावाणी आहे चित्तीं समाधान.
शिशिर आणतो वाळवंटांतून
कांपरा भेसूर मृत्यु भीषण
दारें ठोठावतो करीत भग्न
मनोगतांना वसंत विच्छिन्न !......
जगावयाचें ?
जगावयाचें ?

☆ ☆

२२....

जगावयाचें—

डोंगरमाथ्यावरी भडकल्या वणव्याच्या ज्वाला
लाल वेष कीं परिधानल्या सुरांगना नाचल्या.
लाल चुटुकसे ओठ तयांचे लाली नेत्रांतुन.
चंचल चमके शेंदूराची रेषा भांगांतुन
त्यांच्या हातीं कलश हिऱ्यांचे मस्त मदिराधार
जास्वंदीच्या गडद स्मिताचे उन्मद करिती वार.

अंतर्यामीं चाले तांडव
अशाच वृत्तींचें--
प्यावें आसव
मदालसेच्या
मदनांकित घरचें !

☆ ☆

२३....

उमरखयामी जीवनांत पण
नवी वेदना सुंद अनामिक
तुझ्या स्मृतीचें अदय विडंबन
बधीरलेली क्षुण्ण फसवणुक !
सळसळणाऱ्या चषकीसुद्धां
अतृप्तीला तृप्ती लाभायाची नाहीं
गुंगी उडतां मद्यार्काची
सुंद मनाला डसावयाची
गांधिलमाशी तुझ्या स्मृतिची
येथिल नियती अंतरांतली
सांगाड्याला जाते हलवत
मूळ मनाचें चरचर कांपित
आत्म्यामधली जाणिव घुसळत.
येथिल नियती अंतरांतली
मद्यजलानें कशी शमावी ?

☆ ☆

२४....

केलें प्रेम तुझ्यावरी
जरी आकाश फाटलें.

अंधारून साऱ्या दिशा
जरी दिग्गज कापले.

भावनांचीं लावियलीं
ठिगळेंही आकाशाला

माझ्या आत्म्याचा आणिक
दिला दिग्गजां आधार.

केलें प्रेम तुझ्यावरी
जैसें कोणी नाहीं केलें

जीवनाच्या पापण्यांना
मूकतेचे आंसू आले !

☆ ☆

२५....

सूर्य बुडाला पश्चिमभागीं;
व्याकुळ झाली व्योम पोकळी.
आणि उतरली किरमिजलेली
कातरवेळा तिन्ही सांजची.
धूसरलेल्या अंगणांत मम
पिंपळाच्या त्या फांदीवरुनी
हृदयाकारी पानामधुनी
अप्रकाशला दीप आंदुळे......
दीप आंदुळे एकला, लाव ना ग त्याची ज्योत,
कंकणाच्या किंकीणींत उसळूं दे त्याचें तेज.
मूक झाली किणकिण झाला एकाकीच दीप
त्याच्या तैल-तरंगांनीं कसें साकारावें तेज ?
... त्याच्या तैल तरंगांनीं
कसें साकारावें तेज ?
...... आठवताती कुण्या कविच्या कांहीं पंक्ती —
“ प्रेमाच्या अभिसारास्तव, तव प्रेमाच्या गौरवार्थ
दुःख देइ विरहाचें करुणाघन नियती ती.
करी दीप्त विरहाच्या अग्निनें दीपज्योत
विरहाच्या वैभवांत जिंक प्रेम-विश्व पुनः ! ”

☆ ☆

२६....

विरहाच्या वैभवांत
        जिंकावें प्रेम विश्व ?
रे विरहा, तुझ्या क्रीडा-वैभवांत,
पर्वत वांकले नद्यांच्या ओंठांचें घ्यावया चुंबन
स्फोटाच्या हास्यांत दिली कांपत धरणीनें साथ.
विद्युल्लतांनीं पेटविलें सारें दिशांचें अंतर.
चंद्र भडकला वेड्यावाणी डोळां आणूनिया प्राण
इंद्रधनूचा गेला तोल भिरभिरलें त्याचें शीर
चांदण्या नाचल्या अंधारीं, बनोनी आरस पाषाण
चुरमडलीं नक्षत्र-फुलें व्याकुळला रे विश्वाचाही प्राण
रे विरहा, तुझ्या क्रीडा-वैभवांत
दुःख पेटवितें आपलें हिलाल
ठाकतें आम्हांपुढें मरण जिवंत
रे विरहा, तुझें वैभव, दुःखाचें वैभव

☆ ☆

२७....

पडतां उलथुन अभाळ मनचें
चांदण्यांचा उडतो तूर
चंद्राचा तर ऊर फुटोनी
कणाक्षणांचा जळतो नूर.

एक अवंढा थरथरणारा
जाळित येतो सारें अंतर
अंधाराला नच भरणारी
जखम विजेची होते चटकन्.

एकाकी मम असेंच जीवन...
आग वाहते श्वासामधुनी
रस लाव्ह्याचा रंध्रामधुनी
जळतें तेजव ओंठामधुनी !

☆ ☆

२८....

विरहाचें वैभव
असेंच न्यारें;
विरहाचें वैभव, दुःखाचें वैभव.
अन् दुःखाच्या रूपांत, रूपाचेंच द्वैत
जरि आकार भिन्न तरि एकच तत्त्व.
युगविरही आर्त हुंदका रति-हृदिंचा मदनासाठीं;
लाल शिखा भूकेची धडधडणारी दारिद्र्याच्या मनांतली;
पुरूरव्याची तडफड घ्यावया वीज रिकाम्या हातांत;
द्रौपदीची हांक,—"लाज राख सख्या कृष्णा आज!"
सांडतां पिंगट सडा हृतबलांची धडपड विद्ध.
हीं सारीं एकच
जरी रूपें भिन्न
स्वरूपांत त्यांच्या
दुःखाचें अद्वैत!

☆ ☆

२९....

त्या अद्वैतांत पाहीन
दुःखितांचें अंतरंग
दुःखितांच्या नेत्रांतलीं
उष्ण...आंसवें पुशीन.

मनामध्यें फुलवीन
समष्टीचें चैतन्य
हळव्या या आर्ततेचें
आणि उदात्तीकरण.

त्या निःसीम चैतन्यांत
अहंकार पांगुळेल
तेथें प्रेम रसरूप
अमृतरूपी बनेल !

☆ ☆

३०....

मग जागल्या मनांत
विश्वफुलाच्या गंधाच्या
लाटा येतील जोरांत,
"दत्त, दत्त, दयध्वम्."

जगण्याच्या जाणीवेंत
तृषितांची होण्या तृप्ती
रेताडल्या प्रदेशांत
पाणपोया घालीन मी.

तृप्तल्या आत्मारामाचा
येतां मग पडसाद
त्यांत तुला न्याहाळीन
आणि तृप्तावेल मन!

☆ ☆

## ३१....

माझ्या निढळाचा घाम
    ओसंडेल मातीवर
त्याच्या स्निग्ध ओलाव्यानें
    न्हाणतील पाषाण.

दगडाच्या धमनींत
    रक्त वाहीलच नवें
मृत्तिकेच्या गर्भांतून
    रुजायाचें बीज नवें.

येतां बीजाबीजांतुनी
    नवी कोवळी पालवी
वर्षतील नभांतूनी
    बोल तव ओथंबूनी :

" इथेंहि आहे तिथेंहि आहे :
सर्व ठिकाणीं भरुनी उरले—
प्रकाश–छाया, स्वप्निल गंध
विनातनूचे अवखळ रंग. "

☆ ☆

३२....

आतां फाटला

जडमायेचा अंतरपाट.

आतां उमगलें

प्रेमाचें गूढ

येशिल तूं, नव्या नव्या रूपांत
सहाही ऋतूंच्या नृत्याच्या पदांत
पृथ्वीच्या व्योमाच्या रंगाच्या गानांत
पहांटकालीं उमलणाऱ्या सुषमेच्या तेजांत
शरिरामधल्या रोमांचित स्पर्शांत
मुग्ध मिटल्या नयनांमध्यें अंगुष्ठ—रूपांत
चित्तामध्यें अमरशांत नव्या नव्या वेषांत !

☆☆

## ३३....

कधींतरी अनंताची
हांक येतां व्योमांतून
व्योमगंगेच्या जलानें
कुंभ आणीन भरून.

कुंभावर तारकांची
काढलेली वेलबुट्टी
आकाश-जलाला आणि
व्योम-पुष्पांची खुमारी.

साच येशिल तेथें तूं
पसरुन ती अंजुली;
आणि आकाश-सिंधूंत
बिंदु-बिंदुची मिळणी !

☆ ☆

३४....

येतो वारा सावकाश
येइल तो भरारत
नभीं मेघ सांचतील
तृप्त विजा नाचतील.

सडसडेल पाऊस
पूर्ण भरेल रांजण
वर्षतील वृक्षांतून
बिंदू टपोर टपोर.

ओल्या त्या शिरशिरींत
वृक्षांना बिलगतील
तजेलल्या हिरव्या वेली
पुष्पीं परतेल लाली

☆ ☆

३५....

जीविता आसावली

गूढता अन् दाटली

स्तब्धतेच्या अंतराळीं

शांतता सामावली

चंद्रताऱ्यांच्या चुऱ्याचें

आज होतें मंथन

जीवनाच्या स्वर्णतंतुन

ध्रूवतेचें मीलन.

☆ ☆

किंमत एक रुपया

चित्रशाळा प्रकाशन

किंमत एक रुपया

चित्रशाळा प्रकाशन